Printing Area
Special Issue April-2018
International Multilingual Research Journal
ISSN 2394-5303



# Father of Indian Constitution : Dr. Babasaheb Ambedkar

Prof. Dinesh Jaronde

Sonpeth
Pin-431516
Warpudkar ACS College
Ta.Sonpeth Dist.Parbhani

ISSN 2394 5303 

Printing Area

Index

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

1) A CRITICAL PRESENT PERCEPTION OF PAST ON "PAKISTAN OR PARTITION OF INDIA" ...
Shyamal Kumar Das || 11

2) Dr. B. R. Ambedkar's Vision towards Integral India
Dr. Anjna Malhotra, Dinanagar || 16

3) Dr. B.R.Ambedkar and women Empowerment
Mamta Kashiv, Punjab || 20

4) BHIM RAO AMBEDKAR'S VISION FOR SOCIAL JUSTICE: A RARE PERSPECTIVE
SURUCHI ARORA, Ranjit Avenue, Amritsar || 24

5) DR. B.R. AMBEDKAR AND EMPOWERMENT OF INDIAN WOMEN
Ms. Sarabjit Kaur || 27

6) Dr. Babasheb Ambedkar and WomenEmpowerment in India
Dr. M.K. Gawande, Washim || 31

7) QUEST FOR GENDER EQUALITY: DR. B. R. AMBEDKAR AND...
Drakshamala Bhagwan Jawale, , Aurangabad (M.S) India. || 34

8) DR. BABASAHEB AMBEDKAR CONTRIBUTION IN WOMEN EMPOWERMENT
Asst. Prof. Loveneet Kaur Bajwa, Amritsar || 37

9) GENDER EQUALITY IN EDUCATION SYSTEM
Dr. Prof. prashant k pathak, Bhadrawati || 41

10) Dr. Bhim Rao Ambedkar as an economist: a brief overview
Dr. Sunil Sharma, Jabalpur || 44

11) Pioneer of Social Revolution & National Integration : Dr. BhimraoAmbedkar
Suman Maurya, Jaipur || 46

12) FEMINIST PRINCIPLES OF DR. B. R. AMBEDKAR AND WOMEN EMPOWERMENT
Kishor N. Mahajan, Chandrapur || 48

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



13) Aspects of Dr. B. R. Ambedkar's Thought
Mr. Datta Uttamrao Kuntewad, Tala || 52

14) Dr. Ambedkarthought on Women Empowerment
Dr. Snehal Ramteke, Nagpur || 56

15) DR. BABASAHEB AMBEDKARAND WOMEN
Prof. Shobha Shewale, Mumbai, || 59

16) DR. AMBEDKAR'S PHILOSOPHICAL VIEWS ON EDUCATION
B. THIRUPATHI M.A, Peddapalli || 61

17) Dr. B.R. Ambedkar Views on Higher Education and its Relevance to the Present Society
Shaveta Selly, Dinanagar || 65

18) महान दार्शनिक डॉ बाबासाहेब आंबेडकर नारी सशक्तिकरण (हिन्दु कोड बिल) और ...
रश्मि. बी. वी., धारवाड़ || 68

19) डॉ. आंबेडकर — हिंन्दु कोड बिल — और महिला
प्रा.एस.के.खंडारे, मुर्तिजापूर. || 70

20) बुद्धत्व के अग्रदूत डॉ० भीमराव अम्बेडकर (एक दार्शनिक विमर्श)
डा० शशी रानी अवस्थी, कानपुर। || 72

21) स्वातंत्र्य पुर्व काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून निर्माण झालेली बहुजन ...
प्रा. डॉ. सिद्धार्थ भ. जाधव, यवतमाळ || 75

22) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आर्थिक दृष्टिकोन
प्रा. मिलींद जांभूळकरे, चंद्रपूर || 80

23) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार
प्रा.डॉ.सुनिल शिवमूर्ती रजपूत,अणदूर, प्रा.कांबळे दयानंद .सखाराम, अणदूर || 84

24) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती/जमाती आणि उच्चशिक्षण
डॉ. रविन्द्र मुन्द्रे, अकोला || 87

25)डॉ. आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार
प्रा. डॉ. अंभुरे एस. डी., सोनपेठ || 91

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



26) डॉ. आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणातील योगदान
डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे, सोनपेठ ||93

27) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही विचार — एक अध्ययन
डॉ.राजेश्री एन.कडू, सावरगांव ||95

28) स्त्री उध्दारक : डॉ.बाबासाहेब आंबेडकर
डॉ.उत्तम देवकते, राणीसावरगाव ||98

29) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धर्मांतर
डॉ. निलीमा चौव्हान, नागपुर ||100

30) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महिलासक्षमीकरण विषयक कार्याचे ऐतिहासिक अध्ययन
प्रा.डॉ.सुरेश ल. पंडित, खडकी, अकोला ||103

31) विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार : एक दृष्टिक्षेप
प्रा.डॉ.सुधा मु.खडके (कडू), यवतमाळ ||105

32) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आपेक्षित लोकशाही
प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे) सोनपेठ || 109

33) डॉ.बाबासाहेब आंबेडकर व मनुचे स्त्री विषयक विचार एक तुलनात्मक अध्ययन
प्रा. सुचित्रा शरद ताजणे, मुंबई || 112

34) भारतीय अर्थव्यवस्था तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर के आर्थीक विचार
प्रा. डॉ. सुनील जि. नरांजे, चंद्रपूर ||116

35) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता
कु. हेमलता आनंदराव उराडे, कुरखेडा ||119

36) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार
श्री संजय मारोतराव महाजन, कुरखेडा ||123

37) डॉ.बाबासाहेब आंबेडकर व स्त्री
प्रा डॉ.साधना डी. वाघाडे, जवाहरनगर ||125

38) जाती व्यवस्था आणि स्त्री शोषणाची परंपरा
प्रा. रिता धांडेकर, सक्करदरा चौक, नागपूर ||130

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

Sonpeth ACS College Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



32

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आपेक्षित लोकशाही

प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)
लोकप्रशासन विभाग प्रमुख
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि.परभणी

=============***********==============

भारतीय संविधानाचे शिल्पकार, स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधूता या तत्तवांची आधुनिक भारजीय समाजात प्रस्थापना करणारे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर हे जगातील दहा बुध्दीमान लोकांच्या प्रथमस्थानी असणारे महामानव, यांच्या विविध अंगी विचारांचा अभ्यास करता त्यांच्या विचारांची खोली तपासणे म्हणजे महासागाराची खोली तपासण्याप्रमाणे आहे. अर्थशास्त्र, कायदाशास्त्र, सहकार, शिक्षण, कामगार कल्याण, स्त्री-पुरूष समानता, लोकशाही, धर्मसंस्था, प्रशासन या विषयीचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे अत्यंत मौलिक असुन समाजकल्याण साधणारे आहेत. त्यामुळे त्यांचे विचार प्रत्येक समाजाच्या हिताचे व विकासाचे आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर तथागत गौतमबुध्द, संत कबीर, राष्ट्रपिता महात्मा फुले, राष्ट्रसंत तुकोबाराय, छत्रपती शिवाजी महाराज, यांच्या विचारसणीचा प्रभाव पडलेला दिसून येतो. वरील महामानवांना आपेक्षित असलेला समाज निर्माण करण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिवसरात्र अपार कष्ट घेतले. आपल्या ज्ञानाची खोली वाढविण्यासाठी दिवसरात्र अभ्यास चिंतन ममन केले. आणि भारतामध्ये उत्तम लोकशाही निर्माण करण्यासाठी उत्कृष्ट अशा संविधानाची निर्मिती केली.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिक, वृत्तपत्र, इंटरनेटचा आधार घेतला आहे. तसेच हा शोधनिबंध वर्णनात्मक पध्दतीने मांडला आहे.

**उद्देश :-**

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाहीच्या विचारांचा आढावा घेणे.

२) भारतातील वर्तमान लोकशाहीचा अभ्यास करणे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे मानवी हक्काचे पुरस्कर्ते असून मानवकल्याण हा त्यांचा मुख्य उद्देश होता. यासाठी त्यांनी भारतामध्ये अनेक अंदोलन केली. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या हक्कांचा वापर करता आला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला आपला सर्वांगिण विकास करून घेण्यासाठी समान संधी मिळाली पाहिजे. यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कार्य केले. कामगारांच्या कल्याणासाठी व महिलांच्या हक्कांसाठी संसदेत आवाज उठविला. यावरच न थांबता हिंदू कोडबिल नामंजूर झाले तेंव्हा आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. कारण त्याना जाणीव होती जोपर्यंत महिलांना पुरूषाबरोबर सर्वहक्क समान मिळणार नाहीत तोपर्यंत खऱ्या अर्थाने समाजामध्ये लोकशाही निर्माण होणार नाही. लोकशाही पध्दतीमध्ये कोणत्याही प्रकारचा भोदभाव न करता प्रत्येकाला समान संधी उपलब्ध होणे अनिवार्य आहे. अन्यथा ती लोकशाहीची हत्या होईल.

**लोकशाही संबंधीचे विचार :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाही संस्था व लोकशाही मूल्ये यावर श्रध्दा होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाहीची व्याख्या, ``ज्या शासन पध्दतीत लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात क्रातिकारक स्थित्यंतरे रक्तपाताशिवाय घडवून आणण्यात येतात ती लोकशाही होय``१ डॉ.बाबासाहेबांनी लोकशाही शासन पध्दतीचा आपल्या अध्ययनातून प्राप्त ज्ञान त्याच बरोबर आपल्य सभोवतालच्या शासन पध्दतीतून मिळालेले अनुभव यातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. अब्राहम लिंकन यांनी लोकशाहीची व्याख्या, ``लोकांनी, लोकांसाठी, लोकांकडून चालविलेले शासन म्हणजे लोकशाही शासन होय`` अशी केलेली आहे. या दोन्ही व्याख्यांची तुलना केली असता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना केवळ लोकांनी, लोकांसाठी, लोकांकडून शासन चालविणेच आपेक्षित नसून राज्यातील सर्व लोकांचे जीवनमान उंचावणे तेही कोणत्याही रक्तपाताशिचाय आपेक्षित आहे. लोकशाही ही एक जीवन पध्दती असून यामध्ये कोणत्याही भेदभावाशिवाय समग्र समाजाचे कल्याण करणे आपेक्षित आहे.

``लोकशाही म्हणजे मुख्यत: समाजाची एक रचना होय. त्यात दोन गोष्टी अभिप्रेत आहेत पहिली गोष्ट म्हणजे मनाची वृत्ती ही वृत्ती समाजाच्या इतर घटकांकडे समतेने आणि आदराने पाहण्याची असली पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे सामाजिक रचनेत कडक बंधने नसावीत. नाहीतर लोकशाही अपूर्ण ठरते. लोकशाही म्हणजे सामाजिक संबंधाची फेररचना, जुलूम, जातीयता, गुलामगिरी यातून मुक्त करणारे शासन.``२ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना लोकशाहीमध्ये समता व न्याय या गोष्टी आपेक्षित होत्या. म्हणूनच त्यांनी लोकशाही यशस्वी होण्यासाठी कांही महत्वाच्या गोष्टी सांगितल्या आहेत. १) विरोधी पक्ष, २) समाजात असमानता असता कामा नये, ३) न्यायासनापुढे व समाज व्यवस्थेमध्ये व्यक्तीची समानता राखली गेली पाहिजे, ४)

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



घटनात्मक नितीचे पालन केले गेले पाहिजे, ५) नैतिक व्यवस्थेचे पालन केले गेले पाहिजे, ६) सार्वजनिक सद्सद्विवेकबुध्दी जागृत राहिली पाहिजे.

``तात्विक व व्यावहारिक विचारांचा संगम करून बाबासाहेब लोकशाहीचा पुरस्कार करतात. सामाजिक समता, न्याय प्रस्थापित करण्यासाठी, जातीव्यवस्था निर्मूलनासाठी लोकशाही मार्गच योग्य आहे असे त्यांचे मत आहे. मात्र बाबासाहेबांनी कधीकधी लोकशाहीच्या भवितव्याबद्दल चिंताही व्यक्त केली आहे.``३ त्यांच्या मते भारतासारख्या देशाला अध्यक्षीय लोकशाहीपेक्षा सांसदीय लोकशाहीच सोयीची आहे. सांसदीय लोकशाही नीट राबविली तर सामाजिक समता निर्माण होईल असा त्यांचा विश्वास होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतासाठी सांसदीय लोकशाही पध्दतीचा स्वीकार केला तसेच ही शासन पध्दती यशस्वी होण्यासाठी काही अटी सांगितल्या आहेत. भारतामध्ये मोठ्या प्रमाणात विषमता आहे. ती नष्ट करावयाची असेल तर सांसदीय लोकशाहीचा मार्ग उत्तम आहे. समाजात समानता स्वातंत्र्य एकात्मता व देशप्रेम असले पाहिजे. लोकशाहीमध्ये विरोधी पक्षांना मान्यता असते, पण त्यांनी विरोधासाठी विरोध न करता देशहित लक्षात घेऊन विधायक प्रवृत्तीने सरकारला विरोध करावा. बहुमत वाल्यांचे सरकार बनते हे खरे असले तरी अल्पसंख्यांक मतांना चिरडून राज्य होता कामा नये. अल्पसंख्यांकांचे मतही विचारात घ्यावे. राष्ट्रीय हित हे उदिष्ट असावे. लोकशाहीमध्ये सर्वांचे वर्तन सनदशीर घटनात्मक मार्गाचे असले पाहिजे. संविधान चांगले असले परंतू त्या तत्वांचा जीवनात अंगीकार होत नसेल तर काय उपयोग ? कोणत्याच पक्षाने वा व्यक्तीने घटनाबाह्य वागू नये. अल्पसंख्यांक दुर्बल घटक यांना खास संरक्षण, विशेष, सुविधा असाव्यात बहुमाताच्या बहुसंख्येच्या रणगाड्याखाली आपण चिरडले जाणार, नष्ट होणार असे एकही व्यक्तीला वाटू नये. सांसदरीय लोकशाहीच्या यशासाठी व्यक्तिस्वातंत्र्य, मूलभूत हक्क यांचे सतत रक्षण करणे आवश्यक आहे. यासाठी स्वतंत्र न्यायसंस्था व निर्भीड पत्रकरिता आवश्यक आहेत.४

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाहीवर निष्ठा होती. त्याच बरोबर पन्नास कोटी लोकांना एका छत्राखाली आणून एकसंघ भारत टिकून ठेवण्यासाठी विशेष तरतुदी भारतीय राजघटनेत करण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. सांसदीय लोकशाही बरोबरच भारतीय राज्यघटनेत संघराज्यपध्दतीचा अवलंब करून केंद्र सरकार कसे प्रबळ राहील याचा विचार करून प्रत्येक कलम तयार केले आहे. निश्चितच त्यांच्या या विचारांमुळे भारतीय राज्यघटना सात दशकांचा कालखंड पूर्ण करीत आहे.

आपणास मिळालेले स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी कांही धोके त्यांना जाणवत होते. त्यामध्ये राष्ट्रहितापेक्षा पक्षहिताला श्रेष्ठ मानणे, विभूतिपूजा व केवळ राजकीय लोशाहीवर संतुष्ट मानून सामाजिक, आर्थिक लोकशाहीत तिचे रूपांतर करण्याकडे दुर्लक्ष करणे. या तीन घटकाकडे आबेडकरांनी देशाचे लक्ष वेधले होते. विभूती पुजेवर टीका करतांना त्यांनी जॉन स्टुअर्ट मिल यांचे वाक्य उद्घोषित केले, ``एखादा माणूस कितिही थोर असला तरी त्याच्या चरणावर आपले स्वातंत्र्य अपर्ण करू नये किंवा एवढी मोठी सत्ता त्यांच्या स्वाधीन करू नये की, तो आपली संस्था नष्ट करण्यास समर्थ होईल.``५ आर्थिक, सामाजिक लोकशाहीचे महत्व विशद करताना ते म्हणाले की, स्वातंत्र्य समता आणि बंधुभाव ही जीवनाची तत्व बनली पाहिजे. म्हणजे सामान्य माणसाची व्यक्तिगत व सामूहिक प्रतिष्ठापना प्रस्थापित होईल. समाजाचे स्तरीकरण विभिन्न वर्गामध्ये होऊ नये. मुठभर लोकांचे राज्य जनतेवर असता कामा नये. असा विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा होता. थोडक्यात देशातील प्रत्येक व्यक्तिला समान न्याय, संधी व स्वातंत्र्य मिळायला हवे. प्रत्येकाचा सर्वोत्तम विकास करणारी लोकशाही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आपेक्षित होती. म्हणूनच दलित, श्रमिक, स्त्रिया अशा सर्व कष्टकरी समाजघटकांच्या हातातील लोकशाही हेच एक प्रभावी शास्त्र असल्याची त्यांची धारणा होती.

**वर्तमान भारतीय लोकशाही :-**

२६ जानेवारी १९५० पासून अद्यापर्यंत ६८ वर्षे भारतीय राज्यघटनेनूसार येथील लोकशाही पध्दती अखंडपणे कार्यरत आहे. परंतु या ६८ वर्षाच्या कालावधीत डॉ.बाबासाहेबांना आपेक्षित लोकशाही व्यवस्था निर्माण झाली आहे का ? या प्रश्नाच्या अनुषंगाने विचार केला असता डॉ.बाबासाहेबांना आपेक्षित असलेल्या किती तत्त्वांचे पालन भारतीय राज्यकर्त्यांनी केले आहे याचा अभ्यास करावा लागतो. प्रथमतः समाजातील वाढती विषमता आजही कमी होताना दिसून येत नाही. जात, धर्म, लिंग भेदभाव आजही आढळून येतो. सभागृहातील विरोधी पक्षाची भूमिका पाहता सर्वसामान्य मानसालाही खेद वाटतो. सांसदीय कामकाजावरील वाढला जाणारा खर्च तुलनेत संसदेचे काम फारच अल्प झाल्याचे दिसुन येते. घटनात्मक नितीचे पालन आजही राज्यकर्ते करतात याचा विचार करता आजही राज्यकर्ते समतेचे तत्त्व स्वीकारतात परंतु पालन करतांना दिसत नाहीत. आज न्याय विकत घेता येऊ शकतो. सत्तेत असणाज्या पक्षामधील गुन्हेगारांवरील अरोप सिध्द होत नाही. तर सामान्य व्यक्तीला न्याय मिळत नाही. आजच्या बहुतांश राज्यकर्त्यांची सद्सद्विवेकबुध्दी जागृत आहे असे म्हणता येत नाही. कारण देशातील भ्रष्टाचारावर नजर टाळली असता राज्यकर्त्यांच्या सहकार्यांने अमाप पैशाचा अपहार केल्याची असंख्य उदाहरणे आहेत. मोठ मोठ्या उद्योगपतीकडे पाहण्याचा शासनाचा दष्टिकोण सहाकर्याचा आहे तर सामान्य जनता, शेतकरी कामगार वर्गाकडे शासन दुर्लक्ष करीत आहे. उद्योगपतींना

कर्जमाफी मोठ्या प्रमाणात कर्ज उपलब्ध होते याच बरोबर अनेक प्रकारच्या सेवा सवलती दिल्या जातात. परंतु शेतकऱ्यांना ना योग्य वेळी योग्यध्दतीने कर्जमाफी मिळते ना त्यांनी उत्पादन केलेल्या शेतमालाला योग्य भाव दिला जातो. यामुळे आपण पाहतो आहोत महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढतच आहे. प्रत्येक दिवशी शेतकरी आत्महत्या झाल्याच्या दिसून येत आहेत.

लोकशाही शासन पध्दतीत सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे. शासनाचे ते कर्तव्य आहे असे डॉ.बाबासाहेबांनी म्हटले परंतु आजचे शासन पटसंख्येच्या नावाखाली अनेक शाळा बंद करून सामान्य कुटूंबातील मुलांचा शिक्षणाचा हक्क हिरावून घेत आहे.

लोकशाही शासनपध्दतीमध्ये प्रत्येकाला आपला विकास करून घेण्याची संधी शासनाद्वारे उपलब्ध करून दिली पाहिजे. परंतु आजही भारतात २४ टक्के लोकदारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहेत. यामुळे दारिद्र्यात जीवन जगणारे लोक भारतात आजही मोठ्या प्रमाणात आहेत त्याच बरोबर जातीयवाद कमी व्हावा जेणे करून लोकशाही अधिक दृढ होईल अशी डॉ.बाबासाहेबांची आपेक्षा होती. परंतु याउलट घडले आहे. राजकारणी लोक आपल्या मतपेटीसाठी जातीय तेढ निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात.

शासनकर्त्यांकडून राष्ट्रहितापेक्षा पक्ष हित श्रेष्ठ मानले जात आहे. सत्ताहस्तगत करण्यासाठी राष्ट्रहिताला तिलांजली देणारे लोक शासनव्यवस्थेत कार्य करतात. तसेच कांही लोक तर राष्ट्रहितापेक्षा पक्ष हिताचा विचार स्वार्थाने प्रेरित होऊनच करतात अलीकडल्या काळात पक्षाने निवडणूकीचे तिकिट नाकारले की लगेच दुसऱ्या पक्षात प्रवेश किंवा स्वत:च पक्ष स्थापन करणाऱ्या राजकारण्यांची संख्याही वाढत चालली आहे.

विभूतीपूजा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मान्य नव्हती. परंतु आजच्या लोकशाहीमध्ये व्यक्तिपुजेला आधिक महत्व दिले जात आहे. तसेच लोकशाही ही मुठभर लोकांच्या हातात एकवटली आहे. दलितांच्या कल्याणासाठी राखीव मतदार संघ असावेत यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी खूप मोठ्या प्रमाणात कष्ट घेतले. परंतु अशा मतदार संघातून त्याच कुटूंबातील व्यक्ती निवडून येत आहेत. थोडक्यात आजची लोकशाही व्यवस्था ही वंशपरंपरागत स्वरूपाची झाली आहे असे म्हटले तर अतिशोक्ती होणार नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते सामाजिक व आर्थिक लेकशाही प्रस्थापित झाल्याशिवाय राजकीय लोकशाहीला काहीच अर्थ राहत नाही. परंतु अलिकडच्या काळात सामाजिक व आर्थिक विषमता निर्माण करून सत्ता मिळविणारे लोक अधिक आहेत. त्यामुळे निवडणूकांमध्ये पैसे खर्च करून निवडुन येणाऱ्या लोकांची संख्या अधिक आहे. आज भारतात सर्वत्र मत विकत घेतली जात आहेत. यामुळे भविष्यातील लोकशाहीबद्दल चिंता वाटते आहे.

**निष्कर्ष व समारोप :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील महत्वाच्या राज्यघटनांचा अभ्यास करून तसेच तेथील सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करून भारताच्यादृष्टीने कोणती शासन पध्दती आधिक उत्तम राहील यावर विचार केला आणि भारतासाठी सांसदीय व संघराज्यपध्दतीची वैशिष्ट्ये एकत्रित करून सांसदीय व संघराज्य लोकशाही शासन पध्दतीचा अंतर्भाव भारतीय राज्यघटनेत केला. प्रत्येक व्यक्तिचा सर्वांगिण विकास होण्यास योग्य परिस्थिती निर्माण होईल अशा घटनात्मक कलमांची तरतूद केली. भारतीय लोकशाही विषयी विस्तृत अस विवेचन केले. त्यामुळेच आजही जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून भारताची ओळख निर्माण झाली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटना समितीकडे हस्तांतरीत करीत असतांना २६ नोव्हेंबर १९४९ रोजी काढलेले उद्‌गार फार महत्वाचे वाटतात. ``मै महसूस करता हूं कि संविधान साध्य है, यह लचीला है पर साथ ही यह इतना मजबूत भी है कि देश को शांति और युध्द दोनों के समय जोड़कर रख सके। वास्तव में, मैं कह सकता हूँ कि अगर कभी कुछ गलत हुआ तो इसका कारण यह नही होगा कि हमारा संविधान खराब था बल्कि इसका उपयोग करनेवाला मनुष्य अधम था । ``

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना पुर्ण विश्वास होता की आपण तयार केलेले संविधान संपूर्ण भारतीयांसाठी फार उपयुक्त ठरणारे आहे. कारण येथील सर्वबाबींचा सुक्ष्म अभ्यास करून धर्मनिरपेक्ष व सर्वांचे कल्याण साधणारे संविधान डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केले आहे. म्हणूनच आज विविधतेतून एकात्मता टिकवून ठेवण्यात भारत यशस्वी ठरला आहे. भविष्यातही डॉ.बाबासाहेबांच्या विचारांचे अनुकरण पुर्णत: करून भारत एक महासत्ता बनू शकतो. एवढेच नव्हे तरछत्रपती शिवरायांच्या स्वराज्यासारख्या एक आदर्श आजच्या जगासमोर निर्माण करता येऊ शकतो.

**संदर्भ सूची :-**


१) डॉ. रमेश ढोबळे : आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद जून २०१० पृ.क्र. २४९

२) उपरोक्त पृ.क्र. २४९

३) डॉ.ना.य.डोळे - प्रमुख भारतीय राजकीय विचावंत, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद जून १९९९ पृ.क्र. ९१

४) उपरोक्त पृ.क्र. ९३

५) डॉ रमेश ढोबळे : आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद जून २०१० पृ क्र. २४९


□□□



Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani